दै. देशोन्नती दि. 21/01/25

# विमानतळ पोलिसांनी जप्त केले गांजाच्या झाडांचे अवशेष



देशोन्नती वृत्तसंकलन

**नांदेड** : विमानतळ पोलिसांनी २० जानेवारी रोजी मध्यरात्री केलेल्या कारवाईत डॉ.शंकरराव चव्हाण चौक येथुन गांजाची पाने, फुले, बिया असलेले ३६ हजार रुपये किमतीचे अवशेष जप्त केले असुन गुन्हा दाखल केला आहे.


पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी ऑपरेशन फ्लश आऊटअंतर्गत अवैध धंद्यावर आळा घालण्याचे सर्व प्रभारी अधिकारी यांना आदेश दिले होते. त्या अनुषंगाने विमानतळ ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अधिकारी व अमलदार यांनी वरील नमुद गुन्ह्यातील एन.डी.पी.एस.वर छापा मारणे कामी गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीवरून आरोपी शेख अब्दुल खादर शेख नन्नु रा.मण्यार गल्ली, कंधार याच्याजवळील एका पिवळ्या रंगाचे प्लॅस्टीकच्या पोत्यामध्ये पोलाद गजचे पांढऱ्या रंगाचे चिकटपट्टीमध्ये गुंडाळलेले गांजाच्या झाडाचे अवशेष ज्यास पाने, फुले, बिया असलेले ३ किलो ८८ ग्रॅम वजनाचे प्रति किलो १२ हजार रुपये प्रमाणे किमतीचे असा एकूण ३६ हजार रुपये किंमतीचे गांजाचे अवशेष जप्त करून एकास ताब्यात घेतले.

याप्रकरणी पो.नि. गणेश चव्हाण यांनी दिलेल्या फिर्यादीवरून विमानतळ पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सपोनि जोंधळे हे करीत आहेत.

: मिठाई, शालेय साहित्य वाटप

दै. गोदातीर दि. 21/01/25

# तीन किलो गांजासह एकाला अटक



**नांदेड (प्रतिनिधी)**- शहराच्या विमानतळ पोलिसांनी आपल्या हद्दीत गस्ती दरम्यान एकाला अटक करण्यात आली. त्याच्याकडून तीन किलो ८८ ग्रॅम वजनाचा गांजा जप्त करण्यात आला. ती कारवाई २० जानेवारीच्या पहाटे शंकरराव चव्हाण चौक परिसरात करण्यात आली.

ऑपरेशन फ्लश आउट अंतर्गत शहरातील विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोलीस निरीक्षक गणेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विनोद साने व त्यांची टीम ही कामठा बायपास शंकरराव चव्हाण परिसरात गस्तीवर होते. दरम्यान, मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधआरे संशयास्पद फिरणारा शेख अब्दुल खादर शेख नन्नू (वय ६४ राहणार मन्यार गल्ली कंधार, हल्ली मुक्काम टायर बोर्ड देगलूर नाका नांदेड) याला ताब्यात घेतले. त्याच्या हातातील पिशवीची तपासणी केली असता त्यात तीन किलो ८८ ग्राम वजनाचा गांजा ज्यात पान, बोंड असे अवशेष आढळून आले.

पोलिसांनी शेख अब्दुल खादर याला विमानतळ पोलीस ठाण्यात आणले. पोलीस निरीक्षक गणेश चव्हाण यांच्या फिर्यादीवरून एनडीपीएस अंतर्गत त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास स्वत: पीआय चव्हाण करत आहेत.